दैनिक
सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक
सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2019-2021
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम



# भ्रष्टाचाराची कीड

जगन घाणेकर,
घाटकोपर, मुंबई

भ्रष्टाचार ही देशाला लागलेली एक महाभयंकर कीड आहे याबाबत कुणाचेही दुमत असू नये. सरकारी कार्यालयांत तो विशेष करून दिसून येतो. आजतागायत अनेक सरकारे आली आणि गेली; मात्र भ्रष्टाचाराचे उच्चाटन करण्यासाठी कोणीही विशेष प्रयत्न केलेले नाहीत. शिपायापासून बड्या अधिकाऱ्यांपर्यंत भ्रष्टाचाराची पाळेमुळे पसरलेली असतात त्यामुळे कारवाई तरी कोणावर करायची हा प्रश्नच असतो. भ्रष्टाचारावर अंकुश ठेवण्यासाठी सरकारचा स्वतंत्र लाचलुचपत प्रतिबंधक विभाग आहे. या विभागाकडून प्रतिवर्षी भ्रष्टाचाराची शेकडो प्रकरणे उघडकीस आणली जातात; मात्र त्यांपैकी किती प्रकरणात कारवाई होते ?

महाराष्ट्र लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने ज्या अधिकाऱ्यांना लाच घेताना पुराव्यानिशी पकडले आहे अशा १७३ अधिकाऱ्यांवर प्रशासनाने साधी निलंबनाची कारवाईही केलेली नाही. शासनाच्या २१ विभागांमधील या १७३ अधिकाऱ्यांमध्ये ३० प्रथम श्रेणीचे तर २८ द्वितीय श्रेणीचे आणि अन्य तृतीय श्रेणीचे अधिकारी आहेत. भ्रष्टाचाराच्या प्रकरणात पुराव्यानिशी पकडल्यास आरोपी अधिकाऱ्यांना त्वरित बडतर्फ करणे अपेक्षित असते. उच्च न्यायालय जोपर्यंत निर्णय रद्द करत नाही तोपर्यंत संबंधित अधिकाऱ्याला सेवेत राहता येत नाही; मात्र सद्यस्थिती पाहता एव्हढ्या मोठ्या प्रमाणात अधिकाऱ्यांचे निलंबनच झाले नाही याचा अर्थ या भ्रष्ट अधिकाऱ्यांचे लागेबांधे वरिष्ठ अधिकारी आणि सरकारपर्यंत आहेत हे निश्चित आहे.

सरकार आणि वरिष्ठ अधिकारी या भ्रष्ट अधिकाऱ्यांना संरक्षण का पुरवत आहे हे शोधून काढणेही महत्वाचे आहे. जागरूक नागरिक आणि लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी मोठ्या परिश्रमाने जीवावर खेळून या भ्रष्ट अधिकाऱ्यांना पकडतात, त्यांच्याविरोधात पुरावे गोळा करतात आणि वरिष्ठ पातळीवर या अधिकाऱ्यांना अभय दिले जात असेल, तर त्या कारवाईला तरी काय अर्थ आहे ? अशाने भ्रष्टाचाराचे कधीतरी निर्मूलन होईल का ?

आजमितीला भ्रष्टाचार ही एक फार मोठी समस्या बनली आहे. दिल्लीपासून गल्लीपर्यंत सर्वच ठिकाणी भ्रष्टाचाराशिवाय पान हलत नाही. आज सर्वच क्षेत्रात भ्रष्टाचार एव्हढा मुरला आहे कि त्याचे निर्मूलन करणे सरकारपुढील मोठे आव्हान असणार आहे. विकासासाठी आणि जनतेच्या सोयीसुविधांसाठी शासनाकडून विविध योजना आखल्या जातात. त्यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर केला जातो; मात्र राजकीय क्षेत्रातील भ्रष्टाचारामुळे या शासकीय योजना आणि निधी तळागाळापर्यंत येईपर्यंत त्यातील बराचसा मलिदा राजकीय मंडळींकडून लाटला जातो.



माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांनी देशातील भ्रष्टाचारावर भाष्य करताना म्हटले होते 'सामान्य लोकांच्या योजनांसाठी दिल्लीतून निघालेल्या १०० रुपयांपैकी सामान्य लोकांपर्यंत केवळ १० रुपयेच पोहोचतात.' शासकीय कार्यालये भ्रष्टाचाराची कुरणे आहेत, असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. शहरांसारख्या प्रगतशील भागांत शासकीय अखत्यारीतील काही क्षेत्रांत ऑनलाईन अर्ज प्रक्रिया आणि डिजिटलायझेशन यांमुळे सामान्य जनतेचा सरकारी अधिकाऱ्यांशी थेट संपर्क येत नसल्यामुळे भ्रष्टाचारावर काही अंशी अंकुश आला असला, तरी ग्रामीण भागातील अशिक्षित जनतेची भ्रष्ट अधिकाऱ्यांकडून लहान सहान कामांत सर्रासपणे लुबाडणूक सुरु आहे.

कर्तव्यभावनेला तिलांजली देऊन जडलेल्या भ्रष्टाचाराच्या सवयीमुळे सरकारी कर्मचारी आणि अधिकारी यांमध्ये काम टाळण्याची वृत्ती निर्माण होत आहे. सामान्य नागरिकांच्या मासिक वेतनातून कररूपाने सरकार दरबारी जाणाऱ्या पैशातून ही सरकारी मंडळी गलेलठ्ठ वेतन घेत असतात. तरीही यांची भूक भागत नाही म्हणून त्याच अन्नदात्याच्या असहायतेचा गैरफायदा घेऊन त्याला लुबाडतात.शिपायापासून वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत भ्रष्टाचाराची एकसंध साखळी असल्याने खालचा अधिकारी कामाचे पैसे मागतो म्हणून वरच्या अधिकाऱ्याकडे तक्रारही करता येत नाही.

सरळमार्गाने काम करून घ्यायचे असेल, तर त्यासाठी सरकार दरबारी अनेकदा चकरा माराव्या लागतात. पुन्हा पुन्हा कामाचे खाडे नकोत म्हणून सामान्य नागरिक अधिकाऱ्याच्या मागणीप्रमाणे पैसे देतो आणि आपला वेळ वाचवतो, अशा प्रकारची ही प्रक्रिया सरकारी कार्यालयांत अविरतपणे सुरु असते. सामान्य नागरिक वेळ आणि कार्यालयाच्या सुट्या वाचवण्यासाठी भ्रष्टाचाराला खतपाणी घालत असतो.

**अर्थात या भ्रष्ट क्षेत्रामध्येही काही कर्तव्यनिष्ठ आणि कार्यतत्पर अधिकारी असतात; मात्र यांची संख्या तुलनेने कमी असल्याने सरकारी कार्यालयांत भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनला आहे.** मासिक वेतनाव्यतिरीक्त अधिक पैसे मिळावेत, कमी मालाच्या मोबदल्यात जास्त नफा मिळावा यासाठी सामान्य व्यक्तीला लुबाडणे, त्याची फसवणूक करणे, त्याच्यावर दबाव आणणे, त्याला परावृत्त करणे यांसारखे सर्व प्रकार भ्रष्टाचारामुळे घडतात आणि यामागे दडलेला असतो तो कमालीचा स्वार्थ तो साधण्यासाठी इतरांचे कितीही नुकसान झाले तरी चालेल पण माझा स्वार्थ साधला जायला हवा ही असुरी वृत्ती, झटपट श्रीमंत होण्याची असूया आणि माझे कोणी वाकडे करू शकणार नाही ही मुजोरी.

भ्रष्टाचारासाठी दिलेला पैसा हा सामान्य माणसाच्या मेहनतीचा आणि प्रामाणिकपणे काम केल्याचा मोबदला असतो. इच्छा नसतानाही तो इतरांना बहाल करताना त्यामागे त्याचा तळतळाटसुद्धा असतो त्यामुळे भ्रष्टाचाऱ्याच्या तो कितपत पचनी पडणार ? अध्यात्मशास्त्रानुसार वैयक्तिक स्वार्थासाठी गैरमार्गाने इतरांकडून धन लुबाडणे हे फार मोठे पाप असून त्याच्या फळस्वरूपात लुबाडणाऱ्याची या नाहीतर पुढील जन्मात निश्चितपणे कित्येक पटीने हानी होते.

ज्येष्ठ विधिज्ञ **श्रीनिवास घैसास** हे 'कायद्याचे बोलूया' या साप्ताहिक सदरातून सर्वसामान्य माणसाच्या जिव्हाळ्याचे विषय अगदी सोप्या शब्दांत वाचकांसमोर ठेवत आहेत. आजपासून ते **जमीन व त्याविषयीची कायदेशीर माहिती** याबाबत लेखन करत आहेत. वाचकांना त्यांच्या लेखांमधून शेतजमीन, बिनशेती जमीन, आरक्षण, कूळकायदा, फसवणूक व त्यावरील उपाय याबाबतीत माहिती मिळेल.

# आजच्या युवकांसमोरील आव्हाने



## मनाच्या हिंदोळ्यावर



**बाबू घाडीगांवकर,**
**त्रिंबक, ता.मालवण.**
**मो. ९४२१७९५९५५.**

**आज स्वामी विवेकानंद जयंती. संपूर्ण भारत वर्षात आजचा दिवस 'राष्ट्रीय युवा दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. देशभरातील युवकांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन यादिवशी ठिकठिकाणी होते. भारताची ओळख जगभरात 'तरुणांचा देश' अशीच आहे. एखाद्या देशाच्या लोकसंख्येत तरुणांची किंवा युवकांची सर्वाधिक टक्केवारी भारतात आहे असे म्हटले जाते. रशिया किंवा इतर काही देशांसमोर सध्या त्यांच्या देशात वाढत जात असलेल्या वृद्धांच्या समस्यांचा सामना करावा लागत असतानाच तरुणाई लाभलेला भारत देश याबाबतीत भाग्यवानच म्हणायला हवा.**

**स्वा**मी विवेकानंद यांचा जन्म १२ जानेवारी १८६३ रोजी कोलकता येथे झाला. त्यांचे मूळ नाव नरेंद्रनाथ दत्त असे होते. त्यांना बालपणापासूनच वेद, उपनिषदे, महाभारत, भगवद्गीता, रामायण यांसारख्या धार्मिक साहित्यात अधिक रस होता. याशिवाय योगाभ्यास, व्यायाम, खेळ, कुस्ती, मुष्टियुद्ध, पोहणे, घोडेस्वारी, लाठीकाठी, गायन, वादन वगैरे विविध छंद त्यांनी जोपासले होते.

महाविद्यालयीन जीवनात त्यांनी पाश्चात्य तर्कशास्त्र, तत्त्वज्ञान, इतिहास आदी विषयांचा सखोल अभ्यास केला. हर्बर्ट स्पेन्सरच्या उत्क्रांतीवादाने ते प्रभावीत झाले होते. याशिवाय त्यांनी प्राचीन संस्कृत व बंगाली ग्रंथांचाही अभ्यास केला. सन १८८१ मध्ये त्यांची रामकृष्ण परमहंस यांच्याशी प्रथम भेट झाली. निमित्त होते एका गायन कार्यक्रमाचे. त्यांचे गायन ऐकून रामकृष्ण परमहंस मंत्रमुग्ध झाले.



तेव्हापासूनच ते रामकृष्णांचे परमशिष्य झाले. त्यांनीच या नरेंद्रनाथांचे 'विवेकानंद' असे नामाभिधान केले. पुढे पुढे तर रामकृष्ण परमहंस यांनी त्यांच्या अपूर्ण राहिलेल्या साऱ्या कामांचा भार विवेकानंदांवरच सोपवीला.११ सप्टेंबर १८९३ रोजी अमेरिकेतील शिकागो येथे जागतिक सर्वधर्म परिषद भरली होती. या परिषदेसाठी हिंदू धर्माचे प्रतिनिधी म्हणून स्वामी विवेकानंद उपस्थित राहिले.

या परिषदेत भाषण करताना सुरुवातीस "अमेरीकेतील माझ्या बंधु आणि भगिनींनो..." असे उद्गार काढताच उपस्थितांनी टाळ्यांचा गडगडाट केला. याशिवाय ' ज्या धर्माने जगाला संहिष्णुता आणि वैश्विककतेचा स्वीकार करण्याची शिकवण दिली, अशा हिंदू धर्माच्या वतीने मी जगातील नवराष्ट्रांचे स्वागत करतो!" अशा शब्दांत स्वामी विवेकानंदांनी आपल्या भाषणाची सुरुवात केली. त्यांचे परिषदेतील भाषण चांगलेच गाजले आणि स्वामी विवेकानंद तेव्हापासून खऱ्या अर्थाने 'विश्वगुरु' बनले. 'एक दिव्य शक्ति लाभलेला हिंदू संन्यासी' अशी ओळख असली तरी स्वामी विवेकानंद यांच्या कार्याची दखल आजदेखील फार मोठ्या श्रद्धेने व अभिमानाने सर्वत्र घेतली जाते हे विशेष.

स्वामी विवेकानंदांनी भारतातील किंबहुना जगभरातील तरुणांना आपल्या दिव्य व अमोघ वाणींने आकर्षित केले. ऐन तरुणाईत धर्मप्रसाराचे, राष्ट्रभावनेच्या प्रचाराचे फार मोठे कार्य केले. त्यामुळेच त्यांचा जन्मदिन 'राष्ट्रीय युवा दिन' म्हणून साजरा होतो. आजदेखील भारतातील तरुणांची संख्या किंवा टक्केवारी लक्षणीय आहे. मात्र या तरुणांना योग्य मार्गदर्शन करण्याची, त्यांना योग्य मार्गावर आणण्याची गरज आहे. विज्ञान, तंत्रज्ञानातील प्रगती, संशोधन व वापराचा विचार करता हे सारे जाणण्यात व वापरण्यात आजची तरुण पिढी स्वभावतःच पारंगत किंवा निष्णात आहे हे सांगण्यासाठी कोणा भविष्यवेत्त्याची गरज नाही. मात्र तरुण रक्त, भडक डोके आणि आक्रमक स्वभाव लाभलेल्या आजच्या तरुणाईला अगदी शांत डोक्याने विचार करावयास लावण्याची, विधायक व समाजहिताच्या कामांत गुंतवून ठेवण्याची खऱ्या अर्थाने गरज आहे. आजच्या तरुणांपुढे बेरोजगारी ही फार मोठी व ज्वलंत समस्या आहे.

आजच्या काळात उच्च शिक्षणाला, तंत्रशिक्षणाला पुर्वीसारखे महत्व राहिलेले नाही. अगदी स्थापत्य अभियंता असलेले तरुण पोटापाण्यासाठी पंधरा वीस हजार रुपयांच्या मासिक पगारावर नोकरी करताना दिसतात. तीच गत उच्चविद्याविभूषित तरुण शिक्षकांची, डॉक्टरांची आहे. या देशातील राजकीय व्यवस्थेने अशा गोष्टींकडे फार गांभीर्याने पाहण्याची खरी गरज आहे. अद्ययावत तंत्रशिक्षण प्राप्त असतानाही तरुणांच्या हातांना तेवढ्या तोलामोलाचे काम मिळाले नाही तर मग अशी उच्चविद्याविभूषित तरुणाई समाजविघातक व विध्वंसक गोष्टींकडे वळते हा आजवरचा इतिहास आहे. अशा तंत्रज्ञांसाठी आपण आवश्यक रोजगार निर्माण करू शकलो तर अशा तरुणाईच्या हातून राष्ट्राच्या नवनिर्माणाचे कार्य निश्चितपणाने घडेल याची खात्री वाटते.

बदललेले राहणीमान, भोगी व विलासी जीवन जगण्याची लालसा, बेरोजगारी, आर्थिक विवंचना, अयोग्य मार्गदर्शन आदी समस्यांमुळे आजची तरुणाई मोठ्या प्रमाणात व्यसनाधीन झाल्याचेही अगदी ठळकपणे जाणवते. एकदा एखाद्या व्यसनाच्या अधीन झालेल्या कोणाही तरुणाला परत पूर्वपदावर आणणे वाटते तेवढे सोपे निश्चित नसते. यावर उपाय म्हणून अगदी सुरुवातीपासून योग्य समुपदेशन व उचित संस्कार आदींच्या माध्यमातून आजची तरुणाई प्राणघातक व्यसनांपासून कशी दूर राहील यासाठी शासकीय पातळीवर ठोस उपाययोजना व्हावयास हव्यात असे या निमित्ताने आवर्जून नमूद करावेसे वाटते. सर्वधर्मसमभाव, सामाजीक एकता, सलोखा आणि विशेष म्हणजे भारतीय संविधानाविषयी निस्सीम आदर असलेली संसदीय लोकशाही शासनप्रणाली आपल्या देशात अस्तित्वात आहे. हा धार्मिक, जातीय, सामाजीक सलोखा कसा टिकून राहील, वृद्धिंगत होईल याची काळजी घेण्याची नितांत गरज आहे असे वाटते. कारण ज्या ज्या वेळेस अशा समानतेस, एकतेस बाधा आणणाऱ्या समाजविघातक घटना घडतात, त्या प्रत्येक घटनेत तरुणाईच आघाडीवर असते. अर्थातच प्रत्येक वेळेस ही तरुणाई स्वतःहून या आगडोंबात उडी घेत नाही. तिला भडकविले जाते, चेतविले जाते. मात्र आपल्या राष्ट्राची तरुण पिढी, भावी पिढी निकोप निर्माण व्हावी असे वाटत असेल तर त्या अनुषंगाने तरुणाईचे उचित समुपदेशन व्हायला हवे.

इंटरनेट, मोबाईल फोन, संगणकाच्या अति वापराचे सर्वात जास्त दुष्परिणाम सध्याच्या तरुणाईलाच अधिक प्रमाणात भोगावे लागत आहेत. समाजमाध्यमांतील विविध समाजविघातक व विध्वंसक क्षेत्रे आजच्या तरुणाईला विळखा घालण्याचा, गळा घोटण्याचा प्रयत्न करीत आहेत. आजच्या तरुणाईने वेळीच सावध व्हायला हवे. आपल्या हातून चुकीचे तर काही घडत नाहीय ना याचे भान ठेवायला हवे. सुसंस्कार अंगी बाणवयास हवे. निरंतर सकारात्मक विचार, दैनंदिन व्यायाम, उचित आहार, उचित विचारसरणी अंगिकारण्याची आज खरी गरज आहे. आजच्या राष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने समस्त तरुणांनी संकल्प करुया, या राष्ट्राच्या निरंतर उभारणीत यापुढे देखील समस्त तरुणाईचे भरीव योगदान असेल आणि ते प्रकर्षाने दिसेल.



# आभाळाची माया

## गावाकडच्याआठवणी




**भावेश लोंढे,**
**दापोली**
**मोबा. ९७६९३८६०९१**

'आ' म्हणजे आत्मीयता आणि 'जी' म्हणजे जीवन.आत्मीयतेने जगायला शिकवणारी समृद्धीचे जीवन म्हणजे आजी.आजी एक कोमल नात्याचा बटवा असतो.तिने अनुभवलेल्या संसारातील बारकावे आपल्या नातवाला,नातीला देत असते. आजी ही माझी पहिली मैत्रीण तर मी तिचा शेवटचा मित्र होतो. म्हणूनच आजी मला अधिक जवळची वाटत होती. घरी जास्त लाड करणारी आजी होती तेव्हा घर सुध्दा गजबजलेलं होतं. अशीच माझी आजी मायाळू, कनवाळू, दयाळु होती. तिच्या खरखरीत, उबदार हाताचा स्पर्श आजही तेवढाच आठवत आहे. जाणवत आहे. आजी म्हणजे घरातील उबदार छत्रछाया. तिच्या गोष्टी, तिचा मायेचा स्पर्श, आणि तिचा सल्ला यांना खास स्थान असतं. आजी नेहमी प्रेमाने वागवते, आणि तिच्या हसण्यातून सुख मिळतं. आम्ही घरातले सारे तिला बाय म्हणून म्हणायचो.

आजीसोबतच्या आठवणी म्हणजे कधी तिच्या मांडीवर बसून ऐकलेल्या गोष्टी, कधी तिने आपल्या हातांनी विणलेली गोधडी, तर कधी तिने शिकवलेली संस्कारांची शिकवण. तिच्या हातचा गरमागरम वरणभात, तिच्या ओव्या, आणि कधी कधी तिच्या रागावण्यातही असलेलं प्रेम हे आयुष्यभर मनात घर करतं.

रागाच्या भरात आईने किंवा बाबाने धपाटा ओढला की,आजीच्या पदरात जावून लपायचे.मग मार कमी खायाला लागायचे;कारण आजी तिच्या पदरात अशी सामावून घ्यायची की बाबांना पुढे येवूनच द्यायची नाही.आईपेक्षा बाबांच्या माराला आजीकडेच धावत जायाचो.मग आजी लेमनच्या गोळ्यांसाठी चार आणे,आठ आणे देवून रडू पळवून लावायची.पैसे हातावर ठेकताच डोळे चोळतच वाण्याच्या दुकानाकडे धूम ठोकायचो.आज आजीची आठवण येता नकळतपणे नयनी पाणी दाटते.आज आजी हयात नाही यांचे दुःख मनाला नेहमीच बोचत असते.

कोकणातील छोट्या गावात कौलारू घरामध्ये आजीसह,आईबाबा आणि आम्ही चार भावंडे राहायचो.तीन भावांमध्ये मोठी बहीण आणि त्यानंतर मी.बहिणीला 'तायडे' म्हणून हाक मारायचो.आजीची ती कपडेधुणी करायची, तर मी आजीला वेळेवर जेवण, पाणी व इतर लागणाऱ्या सर्व गोष्टी बाबांकडून पुरवायचो. आजीला औषधे, तेलफणी, पानसुपारी, कात, तंबाखू मिळण्यासाठी ती संपायच्या आधीच बाबांकडे ह्या गोष्टींची आठवण करून देत असायचो.



आजीचे २००० साली देहावसान झाले. त्यावेळी मी नववीला होतो. दुपारीची वेळ होती. मी शाळेत होतो, त्यावेळी गणिताचा क्लास सुरू होता. अचानक मला मुख्याध्यापकांनी बोलावून घेतले. मला रजा देवून शाळेमध्ये निरोप घेवून आलेल्या दोन इसमांबरोबर घरी पाठवले. मला काहीच कळाले नाही की,नेमकं काय घडलंय ते. कारण आजी तशी बरी होती. मला तिच्याबद्दल जरासुध्दा मनात चलबिचल झाली नाही. मी मनातून खूश होतो की,मला आज शाळेतून लवकर घरी पाठवले. यावेळी नदीवर वाडीतील दोन बायका धुणी धुवत होत्या. त्यांच्यात कुणकुण सुरू होती; पण मला त्याची जाणीव झाली नाही. वातावरणात सामसुम वाटत होते. गावदेवी मंदिरजवळ जाताच घराकडून रडण्याचा आवाज येत होता. घराबाहेर लोकांची गर्दी जमली होती. मी घाबरून गेलो. दप्तर न काढताच बाबांना जावून बिलगलो अन् हमसून रडायला आले. आजीची प्राणज्योत विझली होती."आजी आमच्यात राहीली नाही, यापुढे आजी आम्हाला दिसणार नाही", या विचाराने आणखीच रडू आले. त्यावेळी खूप दुःख झाले. देवाने एकाकी आजीला आमच्यापासून हिरावून नेले होते.

आजीची लुगड्यात घडी घालून पैसे ठेवायची सवय होती.त्या पत्र्याच्या टंकेतील आजीच्या घडी घातलेल्या पैशांची आठवण म्हणजे एक अनमोल गोष्ट होती. आजी त्या पैशांना खूप जपून ठेवायची. प्रत्येक घडीत काहीसे कारण असायचे,एखाद्या नातेवाईकांनी दिलेले पैसे,एखाद्या मंगल कार्यात मिळालेली दक्षिणा, वाचवलेली थोडी बचत, किंवा आठवण म्हणून ठेवलेले एखादं जुनं नाणं. ती नेहमी म्हणायची, "गरज येते तेव्हा हेच उपयोगी पडतं."तिच्या साडीच्या खोचेत किंवा गाठीत नेहमी काही घडी घातलेले पैसे सापडायचे. हे पैसे कधी स्वयंपाकघरातल्या किराणासाठी, कधी नातवंडांच्या खाऊसाठी, तर कधी एखाद्या अनपेक्षित गरजेच्या वेळी उपयोगी येत.त्या पेटीत आजी पैसारुखा आणि सर्व सामान ठेवायची.आजीची शेवटची इच्छा म्हणून नवं लुगडं नेसवून देवाघरी पाठवायची होती.नऊवारी साडी नेसवण्यासाठी पेटी उघडणे गरजेचे होते.पेटीला कुलूप होते.चावी आजीच्या गळ्यातील धाग्यात होती.गोतावळाने खूप प्रयत्न करूनसुध्दा कुलूप उघडत नव्हते;

शेवटी माझ्याकडे चावी देवून कुलूप उघडायला सांगितले अन् आश्चर्य म्हणजे कुलूप सहज उघडले.त्यावरून आजीचा जीव माझ्यावर खूप होता असे सर्वजण बोलू लागले. तेही खरंच होतं कारण आजीचा सर्वात लाडका नातू मीच होतो.माझ्यावर तिचे जिवापाड प्रेम होते.ती माझ्याशिवाय कुणालाच पेटीला हात लावून देत नसे. काही काम असेल तर मलाच हाका मारत असायची.जेवणाचे ताट माझ्या हाताने देईन तेव्हा घ्यायची. मला जिने लहानपणी आंघोळ घातली तिलाच आंघोळ घालायची वेळ माझ्यावर आली होती.आजीची अंत्ययात्रा निघताच मी एकच टाहो फोडला.आजी कायमची मला सोडून निघाली होती.

नातवंडांसाठी तर लुगड्याची गाठ किंवा उशीखाली ठेवलेले पैसे म्हणजे एक लपलेला खजिना वाटायचा. कधी आजी गुपचूप त्यांच्या हातात एखादा रुपया किंवा नोट ठेवायची आणि प्रेमाने म्हणायची, "खाऊ घे!" त्या पैशांतून मिळालेला आनंद इतर कोणत्याही मोठ्या गोष्टीतून मिळू शकत नाही.दरवर्षी फेब्रुवारी महीन्यात गावात उरूस व्हायचा.त्या उरूसात जाताना आजी मला दहा-वीस रुपये हमखास हातावर टेकवायची.मी ही उरलेल्या पैशामधून आजीला गळ्यातील माळ किंवा बांगड्या घेवून यायचो. आजीच्या हातात देताच डोक्यावरून हात फिरवून गालाचा मुका घ्यायची आणि म्हणायची "माझा लाडका गुणाचा बावा" आजी ती वस्तू प्रेमाने स्विकारून जपून ठेवायची .त्या पेटीतून जुन्या काळाचा सुगंध यायचा.आजीच्या मोत्याच्या माळेला खास मानाचं स्थान होतं. ती माळ म्हणजे फक्त एक दागिना नसून, आठवणींचं आणि भावना जपणारं प्रतीक होतं.

शाळेतून,खेळून किंवा कुठूनही घरी आलो की पहिली आजीची विचारपूस करित होतो.ती जेवली की नाही हे आईला विचारून मगच मी जेवत असे.हा नियम मी अखंड पाळला होता.पण आजीच्या निधनानंतर मात्र काही दिवस आजीचा भास होत राहायचा.आजीची सारखी आठवण यायची मग अभ्यासात मन लागत नसे.शाळेमध्ये उदास वाटत असे.जेवण टाळत असे.काही महीने सरल्यानंतर त्या सावटातून बाहेर आलो. दहावी पुर्ण झाली.तिच्या आशीर्वादनेच चांगल्या मार्कांने उत्तीर्ण झालो.पुढील शिक्षणासाठी मुंबई गाठली.शिक्षणासोबत नोकरी करू लागलो.आजीने दिलेल्या शिकवणीमुळेच आज ताठ मानेने जगत आहे.आजही आजी मनात,ह्दयात घर करून आहे.ती माझ्यासाठी कायम पाठीशी आहे असे वाटते.

आजी मटक्याचं खापर जपून ठेवायची. खापर म्हणजे जुन्या काळातली एक अनोखी गोष्ट. मटकं तुटल्यावर त्याचं खापर फेकून द्यायचं नाही, तर ते उपयुक्त बनवायचं, ही आजीची शिकवण होती. त्या खापराचं तिच्या स्वयंपाकघरात किंवा अंगणात एक खास स्थान असे.कधी त्या खापराचा उपयोग वाफवलेल्या भाजीवर झाकण ठेवायला होई, तर कधी त्यात फुले ठेवली जात. उन्हाळ्यात ते खापर झाडांना पाणी घालण्यासाठी किंवा चुलीच्या जवळ वारा अडवण्यासाठी उपयोगी येई.आजी नेहमी म्हणायची, "जुन्या गोष्टींची किंमत असते; त्या वाया जाऊ द्यायच्या नाहीत." मटक्याच्या खापरातून तिच्या काळजीपूर्वक, काटकसरी जीवनशैलीची झलक दिसे. कधी त्या खापराचा वापर मुलांना खेळण्यासाठी होई – खापर फिरवून भात शिजवायचा किंवा त्यावर बाळकडू बनवायचं.आता मात्र आठवणीच्या बाळकडूवर आयुष्य चालले आहे.तिच्या आभाळमायेखाली मी आहे.या बायजा माऊली साठी दोन ओळी

**"माझ्या नजरेसमोर**
**येते प्रतिमा ती थोर**
**माझ्या आजीची आठवण**
**आज गातो तिचं गाणं ......"**

**कलम ४४ क नुसार जमिनीच्या खऱ्याखुऱ्या औद्योगिक वापरासाठी परवानगीची आवश्यकता असणार नाही. परंतु अशी परवानगी नगररचना अधिनियमाने तयार केलेल्या अंतिम वा अंतरिम प्रारूपामध्ये औद्योगिक क्षेत्रामध्ये किंवा अन्य योजनांच्या शेतकी विभागास असलेल्या जमिनीस लागू पडेल किंवा तसेच जिच्याबद्दल पूर्वोवत योजना नाही अशा ठिकाणी लागू असेल किंवा खाजगी विकासकाने हाती घेतलेल्या क्षेत्रात स्थित असलेल्या कोणत्याही जमिनीचे विशेष वसाहत प्रकल्पासाठी लागू असेल मात्र अर्जदार व्यक्तीचा उक्त जमिनीवर निर्बंध हक्क व योग्य प्रवेश पाहिजे.**

तसेच ती जमीन विकास योजनेत सार्वजनिक कामासाठी राखीव नसेल तर लागू असेल मात्र तो उद्योग रेल्वे मार्गापासून ३० मीटरच्या आत किंवा उच्च दाब पारेषण मार्गापासून १५ मीटरच्या आत असता कामा नये किंवा ती जमीन भूमी संपादन कायद्यानुसार संपादनास प्रायोजित असता कामा नये. तसेच पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात असता कामा नये. तसेच पर्यावरणे, सार्वजनिक आरोग्य, शांतता, सुरक्षितता, सागरी विनिमय संरक्षण क्षेत्राचे नियम यांचे उल्लंघन होता कामा नये.
तसा वापर सुरू केल्यापासून ३० दिवसांत संबंधित व्यक्ती गाव अधिकाऱ्यामार्फत तहसीलदारास तशी सूचना देईल व विहित नमुन्यात माहिती देईल. त्याची प्रत जिल्हाधिकाऱ्यास देईल.

वरील अटींचे पालन न झाल्यास जिल्हाधिकारी दहा हजारापर्यंत दंड करेल. परंतु तो दंड ज्या जमिनीच्या अकृषिक आकारणीच्या वीस पटीपेक्षा कमी नसेल किंवा ती जमीन मूळ वापरात मात्र त्यापूर्वी जिल्हाधिकाऱ्याने तशी नोटीस देणे आवश्यक आहे व संबंधित व्यक्तीने त्याचे पालन करणे अपेक्षित आहे. तसे न केल्यास जिल्हाधिकारी रोजचे रोज शंभर रुपये प्रमाणे दंड आकारू शकेल.

(वरील सर्व कलम यथास्थित विशेष, वसाहत प्रकल्पासाठी सन २००५ च्या सुधारणेपासून लागू असेल.)

कलम १४८ नुसार प्रत्येक गावात अधिकार अभिलेख असतील त्यात

क) जमीन धारणा करणाऱ्या भोगवटा करणाऱ्या मालक किंवा जमीन गहाण घेणाऱ्या किंवा तिचे भाडे, महसूल आपल्या नावे करून घेत असतील अशा व्यक्तींची नावे.

ख) शासकीय पट्टेदार तसेच कुळांची नावे.

ग) अशा व्यक्तींच्या परस्पर हितसंबंधाचे स्वरूप, त्याची मर्यादा व त्यासंबंधी असलेल्या अटी.

घ) अशा व्यक्तींपैकी कोणत्याही व्यक्तींना द्यावयाच्या वा घेण्याचा खंड किंवा महसूल असल्यास तो खंड किंवा महसूल.

ड) राज्यशासन या बाबतीत केलेल्या नियमान्वये सर्वसामान्यपणे किंवा त्या निर्दिष्टित केलेल्या कोणत्याही क्षेत्राच्या प्रयोजनासाठी विहित करेल असे इतर तपशील.

## कायद्याचे बोलूया!



श्रीनिवास भार्गवराम घैसास,
वकील- उच्च न्यायालय व नोटरी- भारत सरकार
भ्रमणध्वनी- 9869080714.



## भाग - ६
## महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६

**ज्येष्ठ विधिज्ञ श्रीनिवास घैसास हे 'कायद्याचे बोलूया' या साप्ताहिक सदरातून सर्वसामान्य माणसाच्या जिव्हाळ्याचे विषय अगदी सोप्या शब्दांत वाचकांसमोर ठेवत आहेत. आजपासून ते जमीन व त्याविषयीची कायदेशीर माहिती याबाबत लेखन करत आहेत. वाचकांना त्यांच्या लेखांमधून शेतजमीन, बिनशेती जमीन, आरक्षण, कूळकायदा, फसवणूक व त्यावरील उपाय याबाबतीत माहिती मिळेल.**

कलम १४९ नुसार एखाद्या व्यक्तीने जमिनीत अधिकार संपादन केल्यावर त्यापासून तीन महिन्यांत त्याची माहिती तलाठ्याला देण्याची असते. तलाठी त्याच्या संदर्भात चौकशी करून त्याची नोंद करेल. परंतु जिल्हाधिकारी यांच्या परवानगीने किंवा नोंदविलेला दस्त असेल तर तशी माहिती देण्यात सूट असते.

**वरील माहिती कब्जा नसलेल्या गहाणाच्या संदर्भातदेखील असू शकते. त्याची नोंद तलाठ्यास करावी लागते. (T.P. ACT Section 100) Transfer of Property Act Sec 100**

**कलम १५५ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे लेखनातील चूक दुरुस्ती करण्यासाठी.**

अधिकार नोंद करताना चूक झाल्यास एखादा महसूल अधिकारी ती दुरुस्त करू शकतो. मात्र त्याने संबंधित पक्षकारांना त्यापूर्वी नोटीस देऊन त्यात आक्षेप असल्यास त्याचा निकाल लावणे गरजेचे आहे.

**भोगवट्यात नसलेल्या जमिनी**

कलम १६१ नुसार भोगवट्यात नसलेल्या जमिनींचे निस्तार पत्रक जिल्हाधिकारी याने तयार करून ते संबंधित गावात जाहीर करेल व रहिवाशांची मते घेतल्यावर त्यास अंतिम स्वरूप देण्यात येते.

कलम १६२ मध्ये निस्तार पत्रकात कोणत्या बाबींची तरतूद करावी लागते ते सांगितले आहे.

क) गुरे चारण्यास ज्या अटी व शर्तींवर परवानगी देण्यात येईल त्या अटी व शर्ती.

ख) गावातील कोणाही रहिवाशास ज्या अटी व शर्तींवर आणि ज्या मर्यादेपर्यंत.

१) लाकूड, इमारती लाकूड, सरपण किंवा जंगलातील इतर कोणतेही उत्पन्न.
२) मुरुम, कंकर, वाळू, माती, चिकणमाती, दगड किंवा कोणतेही इतर दुय्यम खनिज मिळेल त्या अटी, शर्ती व मर्यादा.
ग) गुरे चारण्याबाबत व परिच्छेद (ख) मध्ये नमूद केलेल्या वस्तू नेण्याबाबत नियमन करणाऱ्या सूचना,
घ) या संहितेन्वये किंवा तद्नुसार विस्तारपत्रकात नोंद करणे आवश्यक अन्य गोष्टींची नोंद करणे.

**कलम १६४ मध्ये दुसऱ्या गावातील पडीक जमिनीवर अधिकार -**
एखाद्या गावात पडीक जमीन अपुरी असल्यास त्या गावातील गुरे चारण्यास जिल्हाधिकारी शेजारी गावातील जमिनीत हक्क काही अटी व शर्तींवर देऊ शकतो. मात्र त्या गावातील रहिवाशांनी तसा अर्ज करणे आवश्यक आहे. या सर्वांची नोंद विस्तार पत्रकात होणे आवश्यक आहे. तसेच जाणे-येणे मार्ग या संबंधातदेखील विस्तारपत्रक करणे आवश्यक आहे.

**कलम १६६ वाजिव-उल-अर्ज**
जी जमीन किंवा पाणी राज्य शासनाच्या किंवा प्राधिकरणाच्या मालकीचे नसेल अशा जमिनी.
क) पाटबंधाऱ्याबाबतचा हक्क किंवा जाणाऱ्या येणाऱ्या हक्क किंवा वहिवाटी.
ख). मच्छीमारीबाबतचे हक्क.
त्या गावातील रिवाजाप्रमाणे ठरतील व त्याची नोंद होईल. अशा नोंदीस 'वाजिव-उल-अर्ज' म्हणतात. या हक्कासंदर्भात वाद झाल्यास दिवाणी न्यायालय हुकूम देईल व त्याची नोंद होईल. दिवाणी न्यायालयाचा हुकूम अंतिम असेल. जमीन महसुलाची व इतर महसूलविषयक मागण्यांची वसुली.

**कलम १६८ जमीन महसुलाचे दायित्व**
1. क) बिनदुमला जमिनीच्या बाबतीत, भोगवटादार किंवा राज्य शासनाचा पट्टेदार
ख) दुमाला जमिनीबाबत वरिष्ठधारक.

ग) कुळाच्या भोगवट्यातील जमिनीबाबत संबंधित कुळ वरील लोक त्या त्या जमिनीबाबत वैयक्तीक व संयुक्तपणे महसूल भरण्यास जबाबदार राहतील.

२) प्रथमतः जबाबदार असलेल्या कोणत्याही व्यक्तीने महसूल भरण्यास कुचराई केली तर ती जमीन ताब्यात असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीकडून जमीन घेऊन महसूल करण्यात येईल.

1. कलम १६९ नुसार राज्य शासनास येणे असलेली रक्कम इतर सर्व मागण्यांच्यापेक्षा प्राधान्याने येईल.

1. कलम १७६ नुसार थकबाकीच्या वसुलीची कार्यपद्धती-

1. क) कलम १७८ नुसार मागील नोटीस

क्रमशः

# नातेसंबंध जपण्यासाठी..

**सीमा पाटील**
**पुणे**



**मानवाचे जीवन नात्यांमुळे समृद्ध होते. कुटुंबीय, मित्र, सहकारी, आणि इतर जवळच्या व्यक्तींशी नाते जपणे हे जीवनातील आनंद आणि समाधानासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. नातेसंबंध मजबूत करण्यासाठी खालील काही उपाय तुमच्या दैनंदिन जीवनात अवलंबू शकता.**

**चांगले नाते टिकवण्यासाठी संवाद हा कणा आहे. प्रत्येक नात्यात स्पष्ट आणि खुले संवाद आवश्यक असतात.**

- नियमितपणे एकमेकांशी संवाद साधा.
- तुमच्या भावना, विचार आणि अपेक्षा स्पष्टपणे व्यक्त करा.
- ऐकण्याची कला आत्मसात करा. समोरच्याचे बोलणे लक्षपूर्वक आणि सहानुभूतीने ऐका.

**नातेसंबंध टिकवण्यासाठी विश्वास आणि प्रामाणिकपणा अत्यंत महत्त्वाचे आहे.**

- खोटे बोलणे, फसवणूक, किंवा दुटप्पी वर्तन टाळा.
- एकमेकांवर विश्वास ठेवून नाते मजबूत करा.
- चुका झाल्यास कबूल करण्यास घाबरू नका.

**नात्यांमध्ये प्रेम व्यक्त करणे आणि काळजी दाखवणे हे आवश्यक आहे.**

- लहान लहान कृतींमधून तुमची काळजी आणि प्रेम व्यक्त करा. उदाहरणार्थ, एखाद्याला वेळेत फोन करून त्याच्या हालचाली विचारणे.
- विशेष प्रसंगी आणि साध्या दिवसांनाही त्यांच्यासाठी वेळ काढा.

**प्रत्येक नात्यात मतभेद होतात, पण त्यांना सकारात्मक मार्गाने सोडवणे महत्त्वाचे आहे.**

- रागावर नियंत्रण ठेवा आणि शांतपणे संवाद साधा.
- मुद्दाम वाद घालणे किंवा भांडणे टाळा.
- परस्पर समजुतीने समस्यांचे निराकरण करा.

**नातेसंबंध जपण्यासाठी वेळ द्यावा लागतो.**

- तुमच्या प्रियजनांसाठी वेळ काढा, जरी तुमची वेळ खूपच कमी असेल तरीही.
- एकत्र वेळ घालवण्यासाठी सहली, खेळ किंवा सोपे गप्पांचे आयोजन करा.

**नात्यांमध्ये नकारात्मक विचार, वर्तन, आणि टोमणे टाळा.**

- कायम सकारात्मक विचार करा आणि इतरांचे चांगले गुण लक्षात घ्या.
- क्षमाशीलता ही नातेसंबंध टिकवण्याचा मुख्य आधार आहे.

जन्मकुंडलीत राहू बलवान असल्यास, शुभस्थितीत असल्यास व्यक्तीला स्वतःला वेळ आणि प्रेम द्या. स्वतः आनंदी असाल तरच तुम्ही दुसऱ्यांना आनंदी ठेवू शकता.

**नात्यांचे महत्त्व:**
नातेसंबंध टिकवण्यासाठी प्रयत्न करणे हे एका व्यक्तीचे कर्तव्य आहे. लहान सहान गोष्टींमध्ये प्रेम, आदर, आणि विश्वास दाखवल्यास नाती अधिक घट्ट होतात. आठवा, नातेसंबंध ही आयुष्यातील खरी संपत्ती आहे.

- सण-उत्सवांच्या निमित्ताने नाती अधिक घट्ट करा.
- नातेसंबंधांमध्ये कधीही ईगो किंवा गर्व येऊ देऊ नका.
- व्यक्तीचा सन्मान करा आणि त्यांना आपल्याबद्दल विशेष वाटेल असे काहीतरी करा.

**आयुष्यातील या सुंदर नात्यांना जपण्यासाठी नेहमी सकारात्मक दृष्टिकोन ठेवा, त्यातून नक्कीच आयुष्य समृद्ध होईल! स्नेह, प्रेम, आणि विश्वासाच्या बळावर नाती सांभाळा आणि आयुष्य समृद्ध करा! सफलता प्राप्त होते.**

**‘ नात्यांचे बंध हे कोमल फुलांसारखे,**
**जपायला हवे त्यांना प्रेमाच्या गंधासारखे.**
**विश्वासाने गुंफावी एक नवी माळ,**
**मनाच्या अंतरंगात धरावी त्यांची सावली खास काळ.**
**संवादाने उजळावी प्रत्येक क्षणाची ज्योत,**
**राग-लोभ विसरून वाढवावा आनंदाचा ओघ.**
**प्रेमाच्या स्पर्शाने घडतात स्वप्न नवे,**
**सहवासाने फुलतात आयुष्याचे रेशमी क्षण थवे.**
**नात्यांतून येतो सुखाचा सोनेरी प्रकाश,**
**मनाची दारे उघडावी, टाळावा एकटेपणाचा नाश.**
**लहान कृतींनी मने जोडली जातात,**
**शब्दांपेक्षा कृतींची ताकद मोठी भासते.**
**आयुष्याच्या वाटेवर या बंधांना जपा,**
**नातेसंबंधांची वीण नेहमी घट्ट ठेवा.**
**प्रेम, सन्मान, आणि विश्वासाची साथ,**
**नात्यांचे बंध कायम ठेवतील तुमचं जीवन सुखात!’**


# महावितरणची लकी डिजिटल ग्राहक योजना
# ऑनलाईन वीज बिल भरून बक्षिसे मिळवा

**महावितरणने ऑनलाईन वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांचा टक्का वाढविण्याच्या हेतूने लकी डिजिटल ग्राहक योजना सुरू केली आहे. या योजनेसाठी ऑनलाईन पध्दतीने वीज बिल भरणा करणारे सर्व लघुदाब वीज ग्राहक पात्र ठरणार आहेत. १ जानेवारी ते ३१ मे २०२५ या कालावधीत सलग तीन वा तीन पेक्षा अधिक वीज बिले भरून योजनेच्या लाभाची संधी ग्राहकांना उपलब्ध करण्यात आली आहे.**

ही योजना महावितरणच्या अशा लघुदाब चालू (LT Live) वीजग्राहकांसाठी लागू असेल, ज्यांनी ०१ एप्रिल २०२४ पूर्वी मागील एक वर्ष म्हणजे ०१.०४.२०२३ ते ३१.०३.२०२४ या कालावधीत एकदाही वीज देयकाचा भरणा केलेला नाही किंवा ऑनलाईन वीज देयक भरणा पर्याय वापरलेला नाही.

**ग्राहकांना लकी ड्रा व्दारे स्मार्ट फोन, स्मार्ट वॉच अशी आकर्षक बक्षिसे दिली जाणार आहेत. ग्राहकांनी ऑनलाईन पध्दतीने वीज बिल भरून लकी डिजिटल ग्राहक योजनेचा लाभ घ्यावा, असे महावितरणचे आवाहन आहे.**

ग्राहक रांगेत उभे राहण्यापेक्षा वेळ, श्रम व पैशांची बचत करीत डिजिटल पध्दतीने वीज बिल भरणा करण्यास प्राधान्य देत आहेत. ग्राहकांना डिजिटल पध्दतीने वीज बिलाचा भरणा करता यावा, यासाठी



महावितरणकडून संकेतस्थळ, महावितरण मोबाईल ॲपची सुविधा ग्राहकांना उपलब्ध करून दिलेली आहे. ग्राहकांना देय रक्कमेवर ०.२५ टक्के डिजिटल वीज बिल भरणा सूट दिली जाते. परिणामी सध्या राज्यात ७० टक्के हून अधिक वीज ग्राहक ऑनलाईन पध्दतीने वीज बिलाचा भरणा करीत आहेत. हे प्रमाण वाढविण्यासाठी ग्राहकांना प्रोत्साहन देण्यासाठी लकी डिजिटल ग्राहक योजना राबविण्यात येत आहे.

महावितरणच्या प्रत्येक उपविभाग स्तरावर एप्रिल, मे व जून २०२५ या प्रत्येक महिन्यात एक प्रमाणे तीन लकी ड्रा ऑनलाईन पध्दतीने काढण्यात येणार आहेत. प्रत्येक लकी ड्रामध्ये पाच विजेत्यांना स्मार्ट फोन व स्मार्ट वॉच ही बक्षिसे दिली जाणार आहेत. योजनेच्या कालावधीत ग्राहकाने नेट बँकिंग, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, यूपीआय, वॉलेट, कॅश कार्ड, एनएसीएच, क्यूआर कोड, एनईएफटी, आरटीजीएस इ. ऑनलाईन वीज बिल भरणा पर्याय वापरून लकी ड्रॉ महिन्याच्या अगोदर दरमहा एकप्रमाणे सलग तीन किंवा तीन पेक्षा जास्त महिने वीज बिल भरणे आवश्यक राहील. अधिक माहितीसाठी महावितरणच्या अधिकृत संकेतस्थळास www.mahadiscom.in भेट द्यावी.

# सरकारी योजना/नोकरी

## आर्थिकदृष्ट्या दुर्बल प्रवर्गातील मुलींनो व्यावसायिक शिक्षण घ्या मोफत..!

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग व कृषी व पशु संवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग या विभागांच्या अधिपत्याखालील शैक्षणिक संस्थांद्वारे राबविल्या जाणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणाऱ्या इतर मागास प्रवर्ग (OBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) या प्रवर्गातील वार्षिक कौटुंबिक उत्पन्न ८ लाख रुपयांपेक्षा कमी असलेल्या पात्र विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभ देण्यात येतो….**

व्यावसायिक शिक्षणामध्ये मुलींचे प्रमाण ३६ टक्के इतके मर्यादित आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार (NEP) व्यावसायिक शिक्षणातील मुलींचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने व मुलींना समप्रमाणात शिक्षणाच्या व्यापक संधी प्राप्त व्हाव्या, तसेच महिला सक्षमीकरणांतर्गत आर्थिक पाठबळाअभावी व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेण्यापासून मुली वंचित राहू नयेत, ही बाब विचारात घेऊन राज्य मंत्रिमंडळाच्या दि. ५जुलै २०२४ रोजी झालेल्या बैठकीत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.


राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/ तंत्रनिकेतने / सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांस, शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralized Admission Process-CAP) (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी, ज्या मुलींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे. अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील, इतर मागास प्रवर्गातील, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या मुलींना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागांकडून सध्या देण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभा ऐवजी १०० टक्के लाभ देण्यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून शासन मान्यता देण्यात आली आहे. तसेच, यासाठी येणाऱ्या रु.९०६.०५ कोटी एवढ्या अतिरिक्त आर्थिक भारासही मान्यता देण्यात आली आहे.

शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क यामध्ये १०० टक्के सवलत देण्याच्या योजनेचा लाभ, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नूतनीकरण केलेल्या), महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय दि.०६.०४.२०२३ मध्ये नमूद केलेल्या 'संस्थात्मक' व 'संस्थाबाह्य' या वर्गवारीमध्ये समाविष्ट होणाऱ्या अनाथ मुले व मुली यांनासुद्धा अनुज्ञेय आहे.

मराठा आरक्षण व सुविधा मंत्रिमंडळ उपसमितीच्या निर्णयानुसार ईडब्ल्यूएस प्रवर्गास इतर मागास प्रवर्गाप्रमाणे उत्पन्न मर्यादेचे निकष एकसमान करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने प्रस्तावित केल्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि.07/10/2017 रोजीच्या शासन निर्णयामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली आहे:

- ईडब्ल्यूएस आरक्षणातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत लाभ अनुज्ञेय करताना, ईडब्ल्यूएस प्रमाणपत्राऐवजी आई व वडील (दोन्ही पालकांचे) एकत्रित उत्पन्नावर आधारित सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र अनुज्ञेय करण्यात येत आहे
- तथापि, जे विद्यार्थी नोकरीत असतील, त्यांच्या आई-वडील यांच्या उत्पन्नासोबत विद्यार्थ्यांचे उत्पन्न, उत्पन्न प्रमाणपत्रासाठी विचारात घेण्यात यावे.
- ईडब्ल्यूएस आरक्षणातून शैक्षणिक प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यास, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ प्रथम वर्षाकरीता मिळाल्यानंतर ही सवलत त्याचा अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत अनुज्ञेय राहील. अशा विद्यार्थ्यांना दुसऱ्या वर्षापासून दरवर्षी उत्पन्न प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही.
- उत्पन्न प्रमाणपत्राबाबतच्या उपरोक्त तरतुदी, 'संस्थात्मक' व 'संस्थाबाह्य' या वर्गवारीमध्ये समाविष्ट होणाऱ्या अनाथ मुले व मुली यांनासुद्धा अनुज्ञेय करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**तरी, व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील, इतर मागास प्रवर्गातील, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या विद्यार्थीनींनी (अर्जाचे नूतनीकरण केलेल्या मुलींसह) या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात येत आहे.**



**दैनिक सिंधुदुर्ग समाचार(मुख्य आवृत्ती ,सिंधुदुर्ग,)संस्थापक,संपादक,कै.प्राचार्य मुकुंद.कदम MALLB** मालक,मुद्रांक,प्रकाशक ऍड रुपाली कदम डांगे **BSL,LLB,MCA RNI No.४३७११/८५** मुद्रणस्थळ न्यू विक्रम मुद्रणालय,कोपर्डे,जि .कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६२०४ येथे छापून प्रकाशनस्थळ/कार्यालय एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग, महाराष्ट्र ४१६००२ येथे प्रकाशित केले. मुद्रणस्थळ: एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग,महाराष्ट्र ४१६००२ .उपसंपादक-विक्रम कदम,कार्यकारी संपादक -प्रा.उज्वला राठोड, डॉ.शर्मिला कदम राजपूत.ई मेल कार्यालयीन पत्रव्यवहार व जाहिरातींसाठी **संपर्क**:**rupasamachar@gmail.com**,बातमी व फोटोंसाठी **संपर्क**:**sindhudurg.samachar@gmail.com** सिंधुदुर्ग -फोन ०२३६७-२३२१९२५, मुंबई,पुणे -९८२२९७९७३२, अरिहंत अपार्टमेंट फोन ०२३१- २५२३००५ मुंबई कार्यालय- सत्यवान बिल्डिंग,पडवळनगर ए ठाणे वेस्ट ४००६०४ .Whatsapp-9108766862

## आठवणींच्या गोष्टी

राष्ट्रपाल सावंत,
चिपळूण- रत्नागिरी
मो. ९४०३१४४३५६..

# मंदार कवाडे ऊत्तम संघटक कलावंत



कवी गायक एक उत्तम संघटक म्हणून मी ज्यांना गेली पंचवीस वर्ष ओळखतो ते रायगड जिल्हा श्रीवर्धन तालुक्यातील दांडगुरी गावचे सुपुत्र मंदार दाजी कवाडे हे नावं महाराष्ट्राला बऱ्या पैकी माहित आहे. माणस जोडणारा माणूस ही त्यांची खरी ओळख. पोटासाठी मुंबईत बेस्ट मध्ये वाहक या पदावर भरती झाले आणि रायटर या पदावरून सन्मानपूर्वक नियत वयोमान नुसार निवृत्त झाले असले तरी. नोकरी, घरासंसार, भावंड नातेवाईक, भावकी समाज याकडे ते आजवर लक्ष दिलेल आहे. प्रत्येकाच हे कर्तव्य असतच पणं नोकरी करता करता सामाजिक प्रबोधन करण्यासाठी वेळ देणं शक्य होत नाही मात्र त्यांनी कलेचा वेळ दिला कलेचा उपयोग केला. कलेत स्वतः ला झोकून दिलं पणं आपल्या मुळ कर्तव्यात कसूर केलेली नाही

दोन मुली एक मुलगा यांना उच्च शिक्षित केलं . मोठी मुलगी ओमान देशात हवाई सुंदरी, दुसरी लेबटेक्निशियन आणि मुलगा कॉम्प्युटर इंजिनियर आहे सर्व सुस्थितीत आहेत. तीन भाऊ एक बहिण या सर्वांना योग्य मार्गदर्शन नी सहकार्य केल्यामुळे भावंडही आपापल्या संसारात सुखी आहेत. हा वारसा त्यांना एकत्रित कुटुंबातून मिळाला हे ते नम्रपणे सांगतात. आई वडील फार सुशिक्षित नव्हते पणं त्यांनी केलेले संस्कार आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर याचा विचार यांचा योग्य प्रभाव त्यांच्यावर पडला आहे.

कवाडे दादांचं दहावी पर्यंतचे शिक्षण दांडगुरी गावातच झाले पुढील शिक्षणं मुंबईत सिद्धार्थ कॉलेज मधून बारावी पर्यंत घेतल. कलाकार लिहितो, गातो पणं या कलाकारच वास्तव जीवन समाजासमोर कधी येतं नाही. तो स्टेजवरून खाली उतरला की त्याची कुणी दखलही घेत नाही. तो कसा जगतोय, काय करतोय त्याच्या अडीअडचणी काय? आणि कोणत्या. त्यानं सन्मानानं जगण्यासाठी त्याला आधार देता येईल का यासर्व गोष्टीकडे समाज आणि समाजातील नेते कार्यकर्ते दुर्लक्ष करतात केवळ एखाद दुसऱ्या कलाकारामुळे सर्वांना एका तराजूत समाज तोलत असतो.

कलावंताच्या न्याय हक्कासाठी आता विविध संघटना संस्था कार्यरत आहेत पुढे राहतील. मुंबईत राहणारे कोकणातील आणि कोकणाबाहेरील सर्व कलावंत यांच्या न्याय हक्कासाठी वीस वर्षापूर्वी कोकणातील चिपळूण टेरव गावचे सुपुत्र प्रख्यात कवी गायक कालकथित बी. टी. कदम यांच्या नेतृत्वाखाली त्यांच्या सर्व सहकलाकार यांच्या साथीने "सम्यक कोकण कला मंच, स्थापन झाला आज त्या संस्थेचे सध्या अध्यक्षपद भूषविणारे मंदार दाजी कवाडे यांच्या कला जीवना विषयी थोडक्यांत.

कोकणरत्न ,कोकण भूषण ,कवीरत्न नवनीतजी खरे यांच्या सहवासात घडलेल्या अनेक व्यक्तिमत्त्वापैकी मंदार कवाडे हे एक नावं. असे अनेकजण खरे आणि बी.टी.यांच्या विचाराने एकत्रित येऊन कला संस्थेसाठी कार्यरत आहेत.त्या सर्वांची माहिती माझ्या वैयक्तीक संग्रही नोंद आहेच. कधीतरी त्यातील काहीजणां विषयी कधीतरी लिहिलं जाईल. समाज प्रबोधन करतांना आपणं सक्षम असलं पाहिजे हे आपल्या गुरूचे म्हणजे नवनीत खरेंचे आणि इतरांचे स्वानुभव बोल त्यांनी स्मरणात ठेवून आपली वाटचाल करत आहेत. ना साथ देणारी पत्नी सौ.सरिता आणि मुली उर्मिला, नमिता, मुलगा भावेश सून दीप्ती ते सहकलाकार आणि सोबतचे कार्यकर्ते पदाधिकारी या सर्वांना यांना धन्यवाद देतात.

कला संस्थेचे प्रमुख पदाधिकारी म्हणून नव्हे एक आपुलकी म्हणून कलाकाराविषयी त्यांच्या मनात आस्था आहे. सर्वांच्या सुखदुःखात पुढे असतात. प्रथम नवनीत खरे, गोपचंद रुके, जनार्दन धोत्रे, श्रीधर ओहळ, मुकुंद तांबे, बी. टी. कदम आणि कवी नरेश शिंदे यांची गीते गातातच पणं स्वरचित गीते सुद्धा उत्तम गातात. त्यांचा स्वतःचा "भावनांचे मोहर"हा कविता संग्रह प्रकाशित झाला आहे.त्यांच्या कविता संग्रहास प्रस्तावना लिहिण्याची त्यांनी मला संधी दिली.

आपल्या आयुष्याच्या आठवणीं सुद्धा "जीवन प्रवाह"या गद्य स्वरुपात पुस्तकं रूपाने प्रकाशित केल्या आहेत.त्यांच्या गद्य पद्य लेखन प्रकाशन सोहळ्यासाठी मला चिपळूण मधून खास निमंत्रीत केले. विवीध क्षेत्रातील मान्यवर मंडळी या प्रकाशन सोहळ्यासाठी उपस्थित होती .दुसऱ्याचा आदर सन्मान करण त्यांचा आवडीचा विषय . काही जून्या कलावंतांची दादांना परिपूर्ण माहिती आहे. कधीही माहितीसाठी, कुणाच्या संपर्कासाठी फोन केला की ते आवर्जून सहकार्य करतात. माझ्या शैक्षणिक लेखन सामाजिक कार्याचा ते आदर करतात. काही जुनी गीते त्यांनी स्वतच्या आवाजात रेकॉर्डिंग केली असून ती कॅसेट,सी डी वॅट्स अप युट्यूब, फेसबुक माध्यम मधून ते शेयर करत असतात. नोकरीतून ते रिटायर झाले असले तरी परिपूर्ण टायर झालेले नाहीत असं आम्ही गंमतीने म्हणतो.

सतत त्यांची भ्रमंती वेगवेगळे उपक्रम सुरु असतात. कवी नरेश शिंदे यांच कार्यक्रम करिता सहकार्य मिळत असल्याचं त्यांनी आवर्जून सांगीतले.महाराष्ट्रातील अनेक नामवंत गायक गायिका समवेत गीत गायनाचे कार्यक्रम केले आहेत. धम्म आणि सामाजिक कार्यातही नेहमीचं पुढाकार असतो.

**"दिवसा राती पुस्तकं हाती**
**झोपेची पर्वा नाही**
**भीम वाचीत राही"**
**"आले ना गौतम सदनी "**
**वर पाहून देखणा दिलीस कोकणा**
**कशी ग पाडलीस मला फशी**
**कोकणच्या या आडदांड वाटा**
**आई मी रस्त्याने चालू कशी ",**
**जा सुखाने नांदाया, बंध मुक्त केले**
**भीमा कोटी कोटी मनाला**
**"माझा बंधुराज येईल मला माहेराला नेईल"**

अशी अनेक भीम बुद्ध रमाई सावित्रीमाई, यशोधरा, राहुल, यांच्या जीवनकार्या सह अशी अनेक प्रबोधन गीते गायली आहेत.

बालपण अतिशय गरिबीत गेलं आई वडील यांनी काबाडकष्ट करून या भावंडाना घडविले. तुम्हीं शिका, समाजात बसा, जमेल तसं समाज कार्य करा हा त्यांचा नी कलेतील गुरू नवनीत खरे यांचा सल्ला ध्यानात ठेवून, चळवळीत, कला क्षेत्रातील त्यांची वाटचाल सूरू आहे. सम्यक कोकण कला संस्थेच नेतृत्व करण्याची संधी मिळाली सर्व कलावंत बंधूंच्या ऊत्तम साथीने तनमन प्रसंगी आर्थिक योगदान देऊन सर्वांच्या विश्वास जपेन. कलाकार यांच्या प्रगतीसाठी त्यांना शासनाचे अनुदान मिळावे त्यांच्या व्यथा योग्य पद्धतीने योग्य ठिकाणी मांडण्यासाठी सर्वांच्या सहकार्याने कार्यरत राहीन अशी मंगल कामना त्यांनी व्यक्त केली.

**कलेचा वारसा मुलगा, सून जपत आहेत, त्यांनी शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेतले आहे. मुलगा ऊत्तम कब्बडी खेळाडू आहे. नात कायराला गाणी आवडतात. शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी या म्हणी प्रमाणे सर्व कुटूंब त्यांना साथ देत आहे त्यांच्या या विचारांना समाज कला कार्यासाठी लेखन गायनासाठी मी ही मंगल कामना व्यक्त करतो.**



# परबीन झाली अंतराळवीर!

## मालवणी बोली



वयल्यांचा कवग्या,
मालवण- सिंधुदुर्ग.

काल सांचेक धावत धावत परबीन आमच्याकडे इली. इल्या इल्याच तिना माका घट्ट मिठी मारल्यान. मीया भीयालय ना ओ अचानक. परबीनीक म्हटला नक्की झाला काय? तशी ती पडयेतच थपकान मारून बसली. मोठ्यामोठ्यान हसाक लागली. ' अगे गावकारनी, मीया आता अंतराळवीर झालंय. माझी आता अंतराळवीर म्हणान निवड झालीहा. आता फुडच्या म्हयन्यात आमची ट्रायल होताहा. एक अमेरीकन कंपनी हा. कंपनी लय मोठी हा. त्या कंपनीन जगातल्या नेमक्याच लोकांक इंटरनॅशनल स्पेस स्टेशन की काय हा ना, थयसर म्हयन्याभराची ट्रीप काढूची येवजल्याना. तेच्यासाठी एक डिजिटल ऑनलाईन प्रश्नावली त्येनी तयार केली.

कालच माका माझ्या मोबायलवर ती इली. मी ती लिंक ओपन केलय. साधे साधे धा प्रश्न व्हते. आपल्याक डोक्या लावला कामच नाय. कारण त्येंची उत्तरा पण थयच व्हती. आपण फक्त चारपैकी एक उत्तर सिलेक्ट करायचा. शेवटी ती प्रश्नावली सबमीट करायची. मी ता सगळा केलय. आणि गावकारनी, काय सांगा... माका धा पैकी धा!" परबीनीक तर आता याड लागाचा बाकी ऱ्हवला व्हता. मीया पण परबीनीची पाठ थोपटलय. ' अगे परबीनी, आमका आजपर्यंत तुझी अशी हुशारी कधी दिसलीच नाय. बरा गे बाय! कधी केलस इतको अभ्यास?' तशी परबीन लाजली.

ती म्हणाली,' खरा सांगाचा तर, माका बाय एकय प्रश्न कळलो नाय व्हतो. मी बाय आपला अंदाज पंचे धावोदर्शे उत्तरा ठोकीत गेलय. पण गोळये नेमके लागले आणि काय, पैकीच्या पैकी मार्क!' दुसऱ्याच क्षणाक त्या कंपनीच्या माणसाचो माका फोन इलो. अगो, बाय तुका काय सांगा, ती कंपनी अमेरिकन असली तरी ना, थयचो कस्टमर केअर वालो खयच्या भाषेत बोला व्हतो सांग. अगो, चक्क मालवणीत! आपल्या मालवणीत!! अगे, आपली मालवणी खय खय जावन पोचलीहा सांग!

त्या धावपळीत परबीनीन माझ्या सासुबायच्या पायार लोटांगण घातल्यान. ' आईनु, आशीर्वाद देवा. तुमच्या सुनेच्या नशीबात नाय. पण मी तुमची शेजारीन, परबीन आता अंतराळवीर झालीहा. लवकरच ती अमेरीकेत जाणार. थयसर आमची तयारी होणार. मी मस्त मेकप करणार. मेकपचा सगळा सामान सोबत घेणार! मस्त धूर सोडीत अंतराळात जाणार! तुम्ही फक्त धूर बघीत ऱ्हवा. शेवट तुमका तोच दिसतलो. मस्तपैकी म्हयनोभर इंटरनॅशनल स्पेस स्टेशनमध्ये ऱ्हवणार. थयच्या लोकांशी गजाली करणार. थयचे माझे फोटू दरोज तुमका व्हाटस् ॲप करणार! मजा! मज्जा!!'

ती म्हणाली,' खरा सांगाचा तर, माका बाय एकय प्रश्न कळलो नाय व्हतो. मी बाय आपला अंदाज पंचे धावोदर्शे उत्तरा ठोकीत गेलय. पण गोळये नेमके लागले आणि काय, पैकीच्या पैकी मार्क!' दुसऱ्याच क्षणाक त्या कंपनीच्या माणसाचो माका फोन इलो. अगो, बाय तुका काय सांगा, ती कंपनी अमेरिकन असली तरी ना, थयचो कस्टमर केअर वालो खयच्या भाषेत बोला व्हतो सांग. अगो, चक्क मालवणीत! आपल्या मालवणीत!! अगे, आपली मालवणी खय खय जावन पोचलीहा सांग!

परबीनीचो पाय काय थाऱ्यावर दिसना. तितक्यात तिचो मोबायल वाजलो. आमच्याकडे हातवारे करीत ती म्हणाली,' गप ऱ्हवा. बोला नको. त्येंचोच फोन हा.' परबीन दोन मिनटा फोनवर बोलली. आमका कळात म्हणान ' हा...



हूं ... ओके...' बोलली. फोन ठेवल्यावर मी आपला विचारलय,' काय गे? काय झाला,' तशी परबीन म्हणाली,' काय नाय गे. त्येनी अभिनंदन केल्यानी. आता उद्यापासून रजिस्ट्रेशन प्रोसेस सुरु करुची हा ना.

आधार कार्ड, पॅन कार्ड, बँक पासबुक फोटो लगेच पाठवा म्हणाले. आणि खास माझ्यासाठी कमी केलेली प्रोसेसिंग फी म्हणान रुपये नऊ हजार चारशे अकरा लगेच ऑनलाईन करा म्हणाले. तेवढीच फी. बाकी काय नाय. बाकीचो सगळो खर्च कंपनी करणार.' मीया म्हटलय,' भारी गे बाय.' फुडच्याच क्षणाक परबीनीन गूगल पे उघडल्यान. फोनवर इलल्या नंबरवर. सांगितलेले पैसे पाठवल्यान.

परत त्या कंपनीचो फोन इलो. परबीनीन फोन घेतल्यान. परत मघाशीचाच... हो... हूं... हो का..... ओके ओके... पाठवतय.' मी परत विचारलय,' आता काय गे परबीनी? उद्याच बोलवतत की काय?' परबीन म्हणाली,' तसा नाय. ही स्पेशल टूर म्हणजे काय खावचा काम हा? आम्ही जातलव त्या अंतराळ यानाची किंमतच अब्जावधी रुपये आसा. शिवाय नाय म्हटला तरी रिस्क ही इलीच ना? देव न करो, पण कधी काय बिघाडला नि अंतराळयान मधीच बिघाडला, क्रॅश झाला, समुद्रात बुडाला तर आम्ही काय जीवंत गावतलव? दुर्दैवान तसा काय विपरीत घडलाच तर आपलो इंशुरन्स आवश्यक आसा म्हणतत. खास आमच्यासाठी अगदी कमीत कमी म्हणजे रुपये एकोणपन्नास हजार नवशे सत्तावन्न इंशुरन्स पॉलिसीसाठी पाठवा म्हणतत. म्हणजे चुकान काय विपरीत घडलाच तर तुमच्या कुटुंबाक तब्बल दोन करोड रुपये मिळणार!

यंदा पैसे साठवून सोन्याचे दोन बांगडे करुचा येवजललय. तेच्यासाठीच ह्योंच्या पाठी लागान पैसे साठवीत व्हतय. पण आसांदे. बांगडे काय आजचे उद्या करूक येतीत. ही अशी अंतराळवीर बनाची संधी काय परत येणार नाय. इंशुरन्स भरूकच व्हयो.' असा म्हणत परबीनीन परत गुगल पे उघडून त्याच नंबरवर तेवढे पैसे पाठवल्यान. ' आता बोलत बसान चलाचा नाय. घराक जावक व्हया. आता कधीव बोलवतीत. तयारी करूक व्हयी. सामानाची आवराआवर करूक व्हयी.' असा म्हणत परबीन घराकडे जावक वळली न वळली तोच परत तिचो मोबायल वाजलो. मघाशीसारखीच तिना आमका गप बसाची खूण केल्यान.' आता आणखी? माझो घोव माका खायत... नाय जमाचा.... मीया साडयेरच येयन... अगे बाय... तो घेवकच व्हयो?... बरा बरा.... आता परत आणखी काय सांगशात... नाय ना? ओके ओके... ठीक.' आता परबीनीचो चेहरो थोडो उतारल्यासारो दिसलो. मी विचारलंय, काय गे? आता काय परत? आताच बोलवतत की काय? तशी परबीन म्हणाली,' तसा नाय गे. ते म्हणतत, अंतराळवीरांचो पोशाख म्हणजे काय साडी नि ब्लाऊज नाय. तो पोशाख लय भारी नि स्पेशलच आसता. त्येची किंमत केलास तर ती पन्नास लाखाच्या घरात जाता. सगळा एकदम स्पेशलच आसता ना गे. पण आमका म्हणान ते फक्त त्रेपन्न हजार आठशे एक्याण्णव रुपयांत प्रोवाईड करतलव म्हणतत. आतापर्यंत इतको खर्च केलास. आता ह्यो एक खर्च केलास की मग बाकी काय नाय. बाकीचा सगळा कंपनी भरतली म्हणतत. अगदी तुमका घेवसाठी तुमच्या घराकडे कार पाठवतलव म्हणतहत. काय करुचा काय कळना नाय. आता नाय पाठवले पैसे तर मगे आतापर्यंत पाठवलले पैसे पाणयात. पाठवलय तर घोव लय खातलो. ' थोडो वेळ मनातल्या मनात विचार करून परबीनीन ते पैसे पण पाठवल्यान. पण आता परबीनीच्या चेहऱ्यावर मघाशीचो आनंद कमी नि घोर जास्त व्हतो.

' गावकारनी वायच तांबयोभर पाणी घेवन ये. कपाल थरथराक लागलाहा.' माझ्याकडे बघीत म्हणाली. मी परबीनीक पाणी आणून दिलय. तिका म्हटलय,' वळयत चल. फॅनखाली बस. वायच बरा वाटात. आता तुका आराम नसतलो. लय तयारी करुची लागतली.' परबीनीन पाणी घटाघटा खाल्यान. तिच्या चेहऱ्यावर वायच तरतरी इली. माझ्याकडे बघीत म्हणाली, थांब, त्येंका परत फोन लावतय. पैसे पोचले की विचारतय. आता आणखी काय मागा नको. माझ्याकडे पैसो शिल्लक नाय सांगतय.' परबीनीन त्येंका फोन लावल्यान. परबीनीचो चेहरो पार उतारलो. 'शी... बाय.. लागना नाय फोन. आता इतक्यांदा लागलो आता असो काय लागता?' म्हणत थयच मटकन खाली बसली. मी पण घाबरा घुबरा झालय ना ओ.

मीया विचारलय,' काय गे, काय झाला?' परबीन म्हणाली, ' फोनच लागना नाय. ह्या नंबरचे सगळे सेवा तात्पुरते बंद केलले आसत म्हणता.' 'आता गे बाय...' म्हणत मी पण थयच तिच्या बाजूक मटकन खाली बसलय. आता ह्या गोष्टीक एक दिस उलटान गेलोहा. परबीनीचो फोन काय लागना नायहा. आता तिचो फोन लागात असा वाटता काय ओ तुमका? माका तर वाटता परबीनीक त्येनी गंडवल्यानीहा. पण ही परबीन एकटीच नाय हा... कदाचित उद्या तुमकाय असे फोन येतीत. अशी लींक येयत... संभाळून ऱ्हवा... खबरदारी घेवा.



## मसालेदार तळलेली मच्छी



स्वाती पाटील
पलूस ,सांगली

आज आपण मसालेदार तळलेली मच्छी पाहूया आणि चाखूया

साहित्य :

- ताजी मच्छी: 500 ग्रॅम (आपल्या आवडीनुसार सुरमई, बांगडा किंवा रावस)
- लिंबाचा रस: 2 चमचे
- हळद पावडर: 1 चमचा
- लाल तिखट: 2 चमचे
- धने पावडर: 1 चमचा
- जिरे पावडर: 1 चमचा
- लसूण पेस्ट: 1 चमचा
- आले पेस्ट: 1 चमचा
- कांदा: 1 मोठा, बारीक चिरलेला
- कोथिंबीर: 2 चमचे, बारीक चिरलेली
- गव्हाचे पीठ/तांदळाचे पीठ: 2 चमचे
- मीठ: चवीनुसार
- तेल: तळण्यासाठी

कृती:

1. मच्छी चांगल्या प्रकारे स्वच्छ धुऊन घ्या.
2. तिच्या तुकड्यांना लिंबाचा रस, हळद, आणि मीठ लावून 10-15 मिनिटे मुरत ठेवा.
3. 2. मसाला तयार करणे:
4. एका वाटीमध्ये लाल तिखट, हळद, धने पावडर, जिरे पावडर, लसूण पेस्ट, आले पेस्ट आणि मीठ एकत्र करून मसाला तयार करा.
5. हा मसाला मच्छीच्या तुकड्यांवर चांगल्या प्रकारे लावा आणि 30 मिनिटांसाठी मुरायला ठेवा.
6. 3. पीठ लावणे:
7. तांदळाचे पीठ किंवा गव्हाचे पीठ पातळसर थराने मच्छीच्या तुकड्यांवर लावा.
8. हे पिठामुळे मच्छी कुरकुरीत तळली जाईल.
9. 4. मच्छी तळणे:
10. तवा गरम करून त्यात तेल टाका. तेल व्यवस्थित गरम झाले की, मच्छीचे तुकडे सावधपणे तव्यावर ठेवा.
11. मध्यम आचेवर मच्छी दोन्ही बाजूंनी सोनेरी व कुरकुरीत होईपर्यंत तळा.
12. 5. सजावट:
13. तळलेली मच्छी बाहेर काढून टिश्यू पेपरवर ठेवा, ज्यामुळे अतिरिक्त तेल निघून जाईल.
14. त्यावर बारीक चिरलेली कोथिंबीर आणि कांद्याचे काप घालून सजवा.
15. परोसताना:
16. ही मच्छी गरमागरम भात, चपाती किंवा भाकरीसोबत द्या.
17. सोबत लिंबाचे तुकडे आणि हिरव्या चटणीचा आनंद घ्या.



## वास्तुशास्त्राच्या सोप्या आणि प्रभावी टिप्स

**वास्तुशास्त्र हे आपल्या घराचे संतुलन आणि सकारात्मक उर्जेसाठी महत्त्वाचे मानले जाते. घरामध्ये सुख-समृद्धी, आरोग्य, आणि शांती नांदण्यासाठी खालील वास्तुशास्त्राच्या काही सोप्या व सहज अमलात आणता येणाऱ्या टिप्स नक्की वापरा.**

1. **घराचा मुख्य दरवाजा:**
- घराचा मुख्य दरवाजा पूर्व, उत्तर किंवा ईशान्य दिशेला असावा.
- दरवाजा स्वच्छ, आकर्षक आणि अडथळामुक्त ठेवा.
- मुख्य दरवाजाच्या बाहेर शुभ चिन्हे जसे की स्वस्तिक, ओम किंवा मांगल्याचे तोरण लावा.

2. **देवघराची जागा:**
- देवघर ईशान्य दिशेला असावे, कारण ही दिशा पवित्र मानली जाते.
- देवघर स्वच्छ ठेवा आणि दिवा रोज लावा.

**3. स्वयंपाकघर:**
- स्वयंपाकघर आग्नेय दिशेला असावे, ही दिशा अग्नीची मानली जाते.
- स्वयंपाक करताना चेहरा पूर्व दिशेला असावा.
- ओटा आणि स्वयंपाकघर स्वच्छ ठेवा, कारण स्वच्छता समृद्धीचे प्रतीक आहे.

**4. शयनकक्ष:**
- शयनकक्ष दक्षिण-पश्चिम दिशेला असावा.
- झोपताना डोके दक्षिण किंवा पश्चिम दिशेला ठेवा.
- बेडखाली अनावश्यक वस्तू ठेऊ नका.

5. **आरसा लावण्याचे नियम:**
- आरसा उत्तर किंवा पूर्व दिशेला लावा.
- शयनकक्षात आरसा बेडसमोर असणे टाळा.

**6. पाणी टाक्या आणि नळ:**
- घरातील पाणी टाक्या उत्तरेकडे ठेवा, कारण उत्तर दिशा धनसंपत्तीची दिशा आहे.
- नळ गळती टाळा, कारण यामुळे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असते.

7. **सकारात्मक उर्जा वाढवण्यासाठी:**
- घरात तुटलेल्या वस्तू किंवा बेकार सामान ठेवू नका.
- नियमितपणे घरात फुलांचा वास किंवा अगरबत्तीचा सुगंध करा.
- घरात रोज मोकळी हवा आणि सूर्यप्रकाश येईल याची काळजी घ्या.

8. **झाडे आणि पाणी:**
- घराभोवती तुळस, मोगरा, किंवा अशोकाचे झाड लावा.
- घराच्या ईशान्य दिशेला पाण्याचा स्रोत जसे की फिश टँक किंवा पाण्याचा माठ ठेवा.

9. **रंगसंगती:**
- घरासाठी हलक्या रंगांचा वापर करा, जसे की पांढरा, फिकट पिवळा, किंवा हिरवा, जे शांतता आणि सकारात्मकता वाढवतात.
- शयनकक्षात गडद रंग टाळा.

**टीप:**
- वास्तुशास्त्राचे नियम पाळताना स्वतःच्या सोयीचे आणि शक्य तितके बदल करा. सकारात्मक दृष्टिकोन आणि स्वच्छता हेच खरे वास्तुशास्त्र आहे!
- सुख, शांती, आणि समृद्धीसाठी हे उपाय वापरून बघा!

# काव्यांगण

## वेदना

संवेदना जाणवण्याच्याही पलिकडे
मारलीय मजल
वेदनेने

गात्रांना पत्ताच नाही
स्वत:च्या अस्तित्वाचा


धडधडीचा मंदावलेला स्वर
पोहोचतच नाहीय
गंतव्यापत

ज्ञान तर इंद्रीयांनी कधीच केलेय
समर्पित;अज्ञाताला

सारी तयारी झालीय
नर्मेधयज्ञाची
मीही कधीचाच तयार;निपचीत
आत्म्याची सदेह आहुती होऊन

फक्त यजमानपद तेवढे तू स्विकार
की झाले.....

**~सुदेश मालवणकर**
**दापोली**




## राजमाता जिजाऊ

माता नुसती शिवबाची नाही
असे रयतेची माय माऊली
करारी बाणा बडेजाव नाही
ती होती सकलजनांची साऊली!!१!!

बोल जरी स्पष्ट आणि दाहक
औषध मात्र सकलांस पोषक
भवानी पुढे माता पुत्र सन्मुख
कृती असे नित्य आश्वासक!!२!!

बाल थोर शिवबाची आई
रणनिती आध्यात्माचेधडे देई
अशी ही शूर वीरांगना सम्राज्ञी
पाठ शुद्ध न्याय सचोटीचे देई!!३!!

रण-राजनितीचे बाळकडू देई
शिवबाला बळ स्फूर्ती नित्य येई
अशी ती माता अन् तिची थोरवी
प्रेरणा देतसे सर्वांपरी
बोध घ्यावा आम्ही जरी
तरी आयुष्याते उद्धारी!!४!!

**सुखदा सयाजीराव गोरड**

## जिजाऊ !

एक उडाली ठिणगी
आणि लाख पेटल्या मशाली !
स्वराज्याच्या संकल्पनेची
जिजाऊ..
तुमच्यामुळे नवीन पहाट झाली !

जागवली मराठी अस्मिता
भगवा आसमंती फडकला !
जिजाऊ...
तुमच्या प्रेरणेने महाराष्ट्राचा
सोनेरी इतिहास घडला !

ज्यांच्या प्रेरणेने
उजळली स्वराज्य ज्योती !
ती होती जिजाऊ...
जिने घडविले
शूर शिवछत्रपती !


रयतेसाठी केले समर्पण
तुम्ही आपले जीवन !
जिजाऊ...
तुम्हाला आमचे
त्रिवार वंदन !

जिजाऊ...
उपकार तुमचे अनेक
नाही कधी फिटणार !
सूर्य चंद्र तारे असेपर्यंत
नांव तुमचे
नाही कधी मिटणार !

**प्रा. के. एस. शिरबंदे,**
**दापोली.**

## वनभोजन

आज वनभोजन साठी जायच आहे या विचारानेच मी सकाळी लवकर उठून शाळेत गेलो . वनभोजन साठी आम्ही निसर्गराईला जायला निघालो . आम्ही चालत निसर्गराईला निघालो होतो . जाताना फोटो काढत काढत निसर्ग राई मध्ये पोहोचलो. मग मी आणि विराज पकडापकडी खेळत होतो. नंतर आम्ही सुपारी सोलण्याचे यंत्र बघितले. नंतर त्या काकांनी आम्हाला थोडीशी या यंत्राबद्दल माहिती सांगितली. मग आम्ही एक स्विमिंग पूल पाहिला. त्यानंतर आम्ही एक माती पासून बनवलेला कुत्रा पाहिला. फिरत फिरत आम्ही एका तलावाजवळ पोहोचलो . त्या तलावात कमळ फुलली होती . मग आम्ही एक मोठा रांजण पाहिला रांजणाबरोबर फोटो काढले. तो रांजण जवळपास 50 वर्षांपूर्वीचा होता. नंतर आम्ही चार कुत्रे बघितले. चालत चालत आम्ही फोटो स्पॉटवर गेलो फोटो काढले. मग मी आणि विराज लोन वर कबड्डी खेळत होतो. नंतर आम्ही चालत चालत खाली गेलो. खाली गेल्यावर आम्ही सोनसाखळी, पकडापकडी इत्यादी खेळ खेळलो .नंतर आम्ही भेळचे साहित्य आणायला वर आलो .भेळीचे साहित्य व व्हॉलीबॉल खाली घेऊन आलो. बाईंनी भेळ करायला सुरुवात केली .



आम्ही तोपर्यंत वॉलीबॉल खेळत होतो. मग आम्ही भेळ खाल्ली .नंतर आम्ही परत खेळत होतो. नंतर आम्ही सर्व मित्र सरांसोबत जंगलात फिरायला गेलो . सरांनी जंगलातील विविध झाडांची माहिती सांगितली. त्या झाडांची नावे सुरंगी, बकुळी ,वड ,किंजल, अंबाडी ,अशोक, कुंडी, काटेसग ,भोकर, रान अबोली , गिरीपुष्प, गोगनवेल , सातवन, सागवन ,बांबूळ ,बुटकी सुपारी, यासारख्या झाडांची माहिती घेतली .त्या झाडांचे फोटो काढले .नंतर आम्ही धरण बघायला गेलो तेथे आम्ही फोटो काढले .नंतर आम्ही आंधळी कोशिंबीर खेळायला गेलो .त्या खेळात बाईंनी राज्य घेतला. मग जेव्हा श्रवणवर डाव आला तेव्हा आम्हाला खूप मजा आली .आम्ही खेळत होतो .नंतर आम्ही सातवी व आठवीच्या मुलांनी डान्स केला .मग आमच्या गाव मंडळाचे अध्यक्ष श्रीधर जाधव काकांनी शाळेतील सर्व मुलांना आईस्क्रीम दिले. मग आम्ही गाण्यांच्या भेंड्या खेळत होतो .मग सर्व शिक्षक धरणावर फोटो काढायला गेले होते. नंतर आम्ही जेवायला गेलो तेव्हा जेवायला चिकन, भात ,वडे होते. सर्व जण पोटभर जेवण जेवले .मग आम्ही,मॅडम गाण्यांच्या भेंड्या खेळत होतो .नंतर आम्ही व्हॉलीबॉल खेळलो. मग आम्ही सोनसाखळी खेळलो. मग मी आणि सिद्धेश दादा व्हॉलीबॉल खेळलो. नंतर आम्ही त्या काकांचे आभार मानले. नंतर आम्ही गाडीत बसून घरी आलो. मला वनभोजन खूप आवडल आम्ही वनभोजनाला खूप मज्जा केली.



**कु. अथर्व सुनील रांगले,**
**शाळा- चंद्रनगर.**



## वनभोजन

जानेवारी महिन्यामध्ये आमच्या शाळेचं वनभोजन जाणार होतं. पहिल आमचं वनभोजन ३ तारखेला जाणार होतं. नंतर मग आमचं वनभोजन ८ तारखेला जाण्याचं ठरलं. मग वनभोजनाचा दिवस उजाडला. मग आम्हाला ८:३० वाजता शाळेत बोलावलं.



मी शाळेत आले. आम्ही सर्वांनी रांगा केल्या. नंतर आम्ही चालत गेलो. आमच्या वनभोजनाची जागा होती, निसर्गराई. आम्ही तेथे पोहोचलो. आम्ही तेथे जाऊन फोटो काढले. आम्ही सोनसाखळी खेळत होतो. बाई पण आमच्या सोबत सोनसाखळी खेळत होत्या. नंतर आम्ही सर्वांनी भेळ खाल्ली. आम्ही परत खेळायला लागलो. तिकडचं सर्व बघत होतो. आम्ही खेचाखेची खेळत होतो.

नंतर आम्ही तेथे नदी बघितली. मग आम्हाला जाधव काकानी आईसक्रीम दिले. बाई, मी,आम्ही फोटो काढत होतो . तेथे आम्ही सूपारी सोलायचे यंत्र बघितले वेगवेगळि झाडे बघितली मग आम्ही गाण्यांच्या भेंडया खेळलो. मग कोळेकर बाई, सावंत बाई, बंटी दादा, सनेहा ताई, राकेश काका हे सर्व पण वनभोजनाला आले होते. आम्ही फोटो काढायला जात होतो तेव्हा बाईंचा पाय मुरगळला. मग आम्ही बाईंना तिथेच बसवले.

**कु. श्रावणी श्रीकांत कोळंबे**
**शाळा- चंद्रनगर.**



## वनभोजन

मी सकाळी लवकर उठलो आणि साडे आठ वाजता शाळेत गेलो. मग आमचे लाडके सर घाडीगावकर सर आले.मग आमच्या लाडक्या काकी आल्या मग सर्व सामान घेऊन आम्ही वणभोजनच्या येथे पायी पायी निघालो.आम्ही जाणार होतो त्या जागेचे नाव निसर्गराई मग आम्ही भरपूर फोटो काढले. मग परत चालत चालत आम्ही एकदाचे पोहचलो. मग आम्ही सुपरी सोळण्याचे यंत्र बघितले ते काका आमच्या सरांना ओळखत होते. मग आम्ही त्या जागेच्या येथे नारळ दिला. काय ती डोंगर काय ती झाडी काय ती हॉटेल समज ओके मधी मग अथर्व आणि मी पकडा पकडी खेळत होतो. मग आम्ही तीन कुत्रे बघितले. त्यामध्ये एक कुत्री होती. आणि मी पेटबुल या कुत्र्याला हात लावला. मग आम्ही सर्व निसर्ग बघितल. मला ते खूप आवडलं.तो एक रांजन ५० वर्षांपूर्वीचा होता. मग आम्ही भेल खल्ली.मी सरांसोबत जंगलात गेलो ज्या झाडाची नाव कोणालाही माहित नाही त्या सर्व झाडांची नाव सरांना माहित होती. मला फक्त मोय,बाबई, सुरंगी,बकुळी, वड,अशोक,आणि गिरिपुष्प या झाडांची नाव मला माहित होते. मग आम्ही मजा मस्ती केली. आणि आम्ही हॉली बॉल खेळत होतो. मग आम्ही बाई अथर्व आणि मी आणी श्रेयस एका-टीम मधून खेळत होतो. मग आम्हाला श्रीधर जाधव यांनी आम्हाला आईस्क्रीम दिला.मग आम्ही आईस्क्रीम खाल्ला. मग आम्ही डान्स केला मग आम्ही गाण्यांच्या भेंड्या खेळत होतो. मग आम्ही पोरींवर एक भेंडी चडवली मग त्यांनी एक भेंडी फिटवली. मग आम्ही जेवायला गेलो मग जेऊन झाल्यावर आम्ही परत गाण्यांच्या भेंड्या खेळत होतो. मला वनभोजन हा दिवस खूप आवडला.

**कु. विराज राजेंद्र मुलुख,**
**शाळा- चंद्रनगर.**



## वनभोजन

मी सकाळी लवकर उठून शाळेत आलो .ळेतून आम्ही निसर्गराईत वनभोजन करायला जाणार होतो. नऊ वाजता शाळेतून आम्ही निसर्गराईत जायला निघालो. रस्त्याने फोटो काढत काढत आम्ही निसर्गराईत पोहोचलो. मग दप्तर ठेवल . थोड्या वेळाने आम्ही सुपारी सोलन्याचे यंत्र पाहिले . मग आम्ही निसर्गराई फिरलो. तेव्हा आम्ही चार मोठे कुत्रे पाहिले. मग आम्ही हॉलिबॉल खेळत होतो. आमच्या शाळेतील शिक्षक सुध्दा हॉलिबॉल खेळत होते. मग तिथे सरांनी नारळ पाणी दिल.

परत आम्ही खेळायला सुरूवात केली. आम्ही तिथे एक पुतळा असलेला कुत्रा पाहिला व एक मोठे रांजण पाहिला. मग आमच्या बाईंनी बनवलेली भेळ खाल्ली.

मग आणि माझे मित्र सरांबरोबर जंगलात फिरायला गेलो. आम्हाला सरांनी जंगलातील विविध झाडांची माहिती सांगितली. त्या झाडांची नावे सांगितली. मोय , बाबई ,सुरंगी, बकुळी ,वड, किंजल ,आंबाडी, अशोक, उंडी कडुनिंब ,काटेआसन, सागवान यासारख्या झाडांची माहिती घेतली .त्या झाडांचे फोटो काढले. आम्ही निसर्गराईत सरांबरोबर पण फोटो पॉईंट वर फोटो काढायला गेलो. फोटो काढून आम्ही निसर्गराईत असलेली एक सुंदर नदी पहायला गेलो. तिथे फोटो काढले. एक पांढरा व काळा बदक पाहिलं. थोड्या वेळाने आम्ही परत खेळायला गेलो. तेव्हा आम्ही ओढाओढी खेळलो . मग आम्ही गोणता उडी खेळलो. मग आम्ही एका मोठ्या आंब्याचा झाडावर चढून बसलो होतो. आम्ही खाली उतरून आंधळीकोशिंबीर खेळलो. बाई पण खेळत होत्या. मग आम्ही हॉलिबॉल खेळत होतो. नंतर आम्ही बॉल ने खेळत होतो. आम्ही सातवी व सहावी च्या मुलांनी डांस केला. आईस्क्रीम खल्ल्यावर आम्ही गाण्यांच्या भेंड्या खेळलो. तेव्हा सर्व शिक्षक धरणावर फोटो काढायला गेले होते. मग आम्ही चिकन आणि वडे खाल्ल्ये. सोनसाखळी खेळल्यावर बाईंनी आम्हाला शांत बसवून सर्वांचे आभार मानले. मग शाळेत आल्यावर आम्ही घरी आलो. मला या वेळीचा वनभोजन खूप आवडला होता.



**कु. प्रसाद नरेश शिगवण,**
**शाळा- चंद्रनगर**

